# मिरा भाईंदर महानगरपालिका

# माहिती व जनसंपर्क विभाग

# प्रसिद्धी पत्रक

- **राष्ट्रीय रिड्यूज, रियूज, रिसायकल फोरमसाठी निवड**
- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बचत गटाचा राष्ट्रीय सन्मान**

**जयपूर, राजस्थान | ३ मार्च २०२५:** मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आणखी एका बचत गटाची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. राजस्थान येथे आयोजित राष्ट्रीय 'रिड्यूज, रियूज, रिसायकल' या फोरममध्ये आयोजित प्रदर्शनात गोल्डन डॉन स्वयं-सहाय्यता बचत गटाला आपली उत्पादने सादर करण्याची संधी मिळाली आहे. ३ ते ५ मार्च या कालावधीत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

पर्यावरणपूरक उत्पादने, तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारच्या गृह निर्माण आणि शहरी कार्य मंत्रालयाच्या वतीने रिड्यूज, रियूज आणि रिसायकल (Reduce, Reuse & Recycle) या फोरमचे (मंच) आयोजन करण्यात येते. यंदा ३ मार्च ते ५ मार्च २०२५ या कालावधीत जयपूर येथील राजस्थान इंटरनॅशनल सेंटर मध्ये ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. या मंचामध्ये विविध देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिनिधी, सरकारी अधिकारी, उद्योगपती, स्टार्टअप्स आणि शाश्वत पर्यावरण विषयक तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. या परिषदेमधील प्रदर्शनासाठी देशभरातील १५ राज्यांतील उत्कृष्ट बचत गटांची निवड करण्यात आली आहे.

या कार्यक्रमात, वारली पेंटिंगवरील नाविन्यपूर्ण आणि पर्यावरणपूरक उत्पादने तयार करणाऱ्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या गोल्डन डॉन स्वयं-सहाय्यता बचत गटाचा समावेश आहे. गोल्डन डॉन बचत गटाचे आणि महापालिकेचे प्रतिनिधींनी या राष्ट्रीय मंचावर आपली उत्पादने प्रदर्शित करणार आहेत. या बचत गटाने तयार केलेल्या कलात्मक वारली पेंटिंगमधून महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडत आहे.

या निवडीबद्दल मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाकडून तसेच स्थानिक नागरिकांकडून गोल्डन डॉन बचत गटाचे अभिनंदन करण्यात येत आहे. अशा प्रकारच्या राष्ट्रीय स्तरावरील मान्यतेमुळे स्थानिक स्वयंसहाय्यता गटांना व्यावसायिक संधी मिळतील तसेच त्यांचे उत्पादन आणि कौशल्य देशभरात पोहोचण्यास मदत होईलो असा विश्वास महापालिकेने व्यक्त केला आहे.